**भूसंपादन अधिनियम**
**भूसंपादन प्रक्रिया विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याची दक्षता घेणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१९/प्र.क्र.९०/अ-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० सप्टेंबर २०१९.

**परिपत्रक-**

भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनुसार, सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी जमीन भूसंपादन करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येते.राज्यातील विकास कामांकरिता प्रकाल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता विवध विभागांकडून जसे कि, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे व इतर या संपादन संस्थांद्वारे भूसंपादनाचे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले जातात. सदर प्रस्तावांवर भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शिकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत विहित केलेल्या तरतुदी व कालमर्यादेत भूसंपादनाची कार्यवाही करून भूधारकांना संपादित जमिनीचा मोबदला अदा करणे बंधनकारक आहे. तथापि, त्याबाबतची दक्षता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात येत नसल्याची बाब मा.न्यायालयाने शासनाचे निदर्शनास आणली आहे.

मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.३१३५/२०१८ मध्ये मा.न्यायालयाने दि.१७/०९/२०१९ रोजी आदेश पारित केले आहेत.सदर आदेशान्वये जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्थ संबंधित अधिकारी यांचेकडून भूसंपादन कार्यवाहीस झालेला विलंब / संबंधित कार्यवाहीकडे केलेले दुर्लक्ष याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मा. न्यायालयीन आदेशाचा विचार करता, संबंधित जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्थ अधिकारी यांनी भूसंपादन प्रक्रिया हि भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्ण करण्यासाठी दक्षता घेणे अत्यंत आवश्यक/ गरजेचे ठरत आहे. त्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून त्यांचे कार्यालयांतर्गत कार्यरत भूसंपादन प्रकरणाचा वेळोवेळी आढावा घेणे व त्यांचे सनियंत्रण करणे अनिवार्य आहे.भूसंपादन कार्यवाहीस विलंब झाल्यास किंवा संबंधित प्रकरणे व्यपगत झाल्यास त्यास संबंधित जिल्हाधिकारी व्यक्तिश: जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९३०१२१८२५०९१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nitin Ganesh Sonkhaskar

Digitally signed by Nitin Ganesh Sonkhaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ad84daad5bc79f6d90c62a987708b24ed191867c04fb6c815de59aff3e614298, cn=Nitin Ganesh Sonkhaskar
Date: 2019.09.30 12:22:53 +05'30'

( नि.ग.सोनखासकर )
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
२. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव
३. अमुस/प्र.स./सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
४. सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी.